Pediatric Nephrology Clinic

KEM Hospital, Pune

KEM Hospital PUNE
Quality and ethics in patient care

**मूत्राविकार माहिती पत्रक**

व्हॉयडींग सिस्टोयुरेथ्रोग्राम

तुमच्या बाळाची (VCUG) ही तपासणी आपल्या हॉस्पिटलच्या क्ष किरण विभागात केली जाते. हया तपासणीमध्ये तुमच्या बाळाच्या मूत्राशयाचे फोटो काढले जातील. ही एक विशेष तपासणी असून हया तपासणीद्वारे तुमच्या बाळाच्या मूत्राशयाबद्दल माहिती मिळू शकते.

लघवी करून आणल्यानंतर तुमच्या बाळाला क्ष किरण विभागातील मोठया टेबलावर झोपायला सांगितले जाते. येथील एक्सरे काढायचे मशिन कॅमेरा व टी. व्ही यांना जोडलेले आहे जेणेकरून तुम्हांला व डॉक्टरांना बाळाचे मूत्राशय टीव्हीवर दिसू शकेल. त्यानंतर डॉक्टर स्वच्छ हातांनी तुमच्या बाळाची लघवीची जागा जंतुनाशक औषधांने साफ करून घेतात व नंतर एक छोटी नळी लघवीच्या जागेतून आत मूत्राशयात घातली जाते. त्यानंतर हया नळीतून एक विशिष्ट प्रकारचे औषध आत घालण्यात येते. तुम्हांला टीव्हीवर हे औषध तुमच्या बाळाच्या मूत्राशयात असल्याचे दिसून येईल. साधारणपणे तुमच्या बाळाच्या पोटाला तडस लागली आहे किंवा ताबडतोब लघवी करावयाची आहे अशी इच्छा होत नाही, तोपर्यंत हे औषध आतमध्ये घातले जाते. त्यानंतर ही नळी काढून टाकलो जाते व टेबलावरती तुमच्या बाळाला लघवी करायला सांगण्यात येते, तेव्हा बाळ लघवी करत असताना बाळाच्या पोटाचे फोटो काढले जातात.